# कोल्हापूर बॅडमिंटन असोसिएशनतर्फे रुतिका सचिन कांबळेचा गौरव

कोल्हापूर: कोल्हापूर बॅडमिंटन असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात, असोसिएशनने आपली प्रतिभा दाखवून दिलेल्या रुतिका सचिन कांबळे हिचा विशेष सत्कार केला. रुतिकाने योनिक्स सनराईज अखिल भारतीय मानांकन बॅडमिंटन मुलींच्या U-15 विजेतेपद पटकावून कोल्हापूरचे नाव उंचावले आहे.

या प्रसंगी, KDBA चे अध्यक्ष श्री. सतीश घाटगे यांनी KDBA तर्फे रुतिकाला ₹२५,०००/- ची रोख रक्कम, मानचिन्ह आणि ₹५,०००/-  ची रोख रक्कम घाटगे ग्रुप तर्फे विशेष पुरस्कार रक्कम प्रदान करून तिच्या पुढच्या यशोगती वाटचाली साठी तिचा गौरव करण्यात आला. या सन्मानाने तिच्या मेहनतीला आणि अथक प्रयत्नांना न्याय दिला, ज्यामुळे कोल्हापूर बॅडमिंटन असोसिएशन व कोल्हापूर ला अभिमानस्पद वाटत आहे.

रुतिका आपल्या पालकांसोबत या कार्यक्रमाला उपस्थित होती. तिने या यशासाठी घेतलेली मेहनत आणि जिद्दीची प्रेरणादायी कहाणी सर्वांसमोर तिच्या पालकानी मांडली. गडहिंग्लजहून कोल्हापूरला स्थलांतर करून तिने आपल्या कौशल्याचा विकास केला व राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम घेतले.

"U-17 गटात पुढे जाण्यापूर्वी असोसिएशनकडून मिळालेल्या या प्रोत्साहनामुळे माझा आत्मविश्वास वाढला आहे," असे रुतिकाने सांगितले. तिच्या कामगिरीने इतर खेळाडूंनाही प्रेरणा दिली आहे. असोसिएशनच्या मते, ती भविष्यात भारताचे प्रतिनिधित्व करून जागतिक स्तरावर यश मिळवेल.

KDBAचे अध्यक्ष श्री. सतीश घाटगे म्हणाले, "रुतिकाचे यश आमच्यासाठी सुवर्ण महोत्सवी वर्षात आनंदाचा क्षण आहे. तिची मेहनत आणि समर्पण इतर खेळाडूंना दिशादर्शक ठरेल. कोल्हापूर बॅडमिंटन असोसिएशन नेहमीच तिच्या पाठीशी उभी आहे & उभी राहील."

रुतिकाचे यश हे केवळ वैयक्तिक नाही तर KDBA आणि कोल्हापूरच्या सर्व खेळाडूंसाठी अभिमानाचा क्षण आहे. तिच्या जिद्दीने सिद्ध केले आहे की योग्य पाठिंबा आणि प्रयत्नाने मोठे यश मिळवता येते.

U-17 गटातील नव्या आव्हानांसाठी रुतिका सज्ज होत असताना, कोल्हापूर आणि KDBA तिच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. KDBA चे पदाधिकारी श्री विनोद भोसले, श्री तन्मय करमरकर, श्री चंद्रशेखर सोवनी, श्रीमती वर्षा नाडगोंडा, श्री सुमीत चौगुले, श्री जगदीश काणे आणि श्री साईदास खणगाव उपस्तित होते & ऋतिका कांबळे हिला पुढचा वाटचालही साठी खूप खूप शुभेच्छा दिल्या।